UNIVERSAL
LIBRARY
OU_192334
UNIVERSAL
LIBRARY

OUP—902—26-3-70—5,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M88 Accession No. M1763

Author K46T

Title

This book should be returned on or before the date last marked below.

किर्लोस्कर मासिकाची उत्कर्ष माला : पुष्प १३ वें

# टांकांच्या फेकी !

शं. वा. किर्लोस्कर
व
ना. सी. फडके

१९३५

किंमत १ रुपाया

प्रकाशक
किर्लोस्कर प्रेस : किर्लोस्करवाडी
जि. सातारा.

[ सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन ]

मुद्रक
कृ. ह. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

या पुस्तकातील

चित्रें शं. वा. किर्लोस्कर यांनीं काढलीं आहेत; व चित्रांच्या अनुषंगानें केलेलें विवेचन ना. सी. फडके यांनीं लिहिलेलें आहे.

अशा प्रकारचें मराठी भाषेंतील हें पहिलेंच पुस्तक आहे, व तें रसिकांच्या आश्रयास पात्र होईल अशी आशा आहे.




मोठे जग हलविणारा छोटा माणूस

# लेखणीचा प्रभाव

लेखणी व तरवार यांपैकीं अधिक सामर्थ्यवान् कोण, या प्रश्नाचें निश्चित उत्तर देणें कठीण असले तरी एवढें खास कीं, लेखणीचें सामर्थ्य तरवारीच्या सामर्थ्याहून कमी नाहीं. वीर तरवार गाजवील तेव्हांच कवीला पोवाडे लिहितां येतील हें जसे खरें, तसें कवीच्या पोवाड्यांच्या श्रवणानें शेंकडों वीरांना स्फूर्ति मिळते हेंही खरें.

जग हालवण्याचें सामर्थ्य समशेरीइतकेंच लेखणींतही आहे. श्रीशिवाजी महाराजांनीं मराठ्यांचें स्वराज्य तरवार गाजवून स्थापिलें. परंतु आपल्या म्यानांतून समशेर उपसण्याची प्रेरणा भारतांतील कथा-श्रवणानें—म्हणजे एका प्रतिभासंपन्न लेखकाचे विचार ऐकल्यानें— त्यांना झाली.

म्हणून, बंधुभगिनींनो, तुम्हांला स्वतःचा व आपल्या समाजाचा अभ्युदय हवा असेल तर प्रथम स्वतःचे विचार अत्यंत तर्कशुध्द आणि तेजस्वी असतील अशी खबरदारी घ्या.

मनुष्य अन्नावर जगतो असें म्हणण्यापेक्षां विचारावर जगतो असे म्हणणेंच अधिक यथार्थ होईल. उदात्त आणि तेजस्वी विचार हीच व्यक्तीची आणि राष्ट्राची खरी शक्ति होय.

अशा सुंदर विचारांची लहानशी माला गुंफून तुम्हांस सप्रेम अर्पण करण्याचें योजिले आहे.

---




अशानें हा हत्ती थोडाच थांबणार ?

# अमोघ अंकुश

स्वातंत्र्य मिळविण्याचें खरें शस्त्र स्वतंत्र विचार !

हे लक्षांत ठेवून प्रत्येकानें आपल्या आयुष्यांतील प्रश्नांचा स्वतंत्र बुध्दीनें विचार केला पाहिजे. अमुक व्यक्ति असे सांगते, किंवा अमुक ग्रंथ असें म्हणतो म्हणून मला अमुक गोष्ट केली पाहिजे असें म्हणावयाची संवय टाकून द्या. स्वतःची विवेकबुद्धि शक्य तितकी वापरा. तिची धार कधीं गंजूं देऊं नका. मी जें करतों त्याला रूढीचा अगर परंपरेचा पाठिंबा नाहीं अशा भयानें घाबरण्याचें सोडून द्या.

कारण असें पहा कीं, परंपरेला चिकटल्याने आजपर्यंत कोणाचीही प्रगति झाली नाहीं. जग हे एकाद्या अजस्र गजराजासारखें आहे. जगाला मागें खेंचून धरण्यासाठीं परंपरा आणि रूढी नेहमींच धडपडत आहेत. ज्याला जगाची प्रगति घडवून आणायची असेल त्याने रूढीचा हट्ट हंसण्यावारी नेऊन आपल्या स्वतंत्र विचारांच्या अंकुशाने जगाला सारखें डवचलें पाहिजे.

अंकुशानें मर्मभेद होतांच हत्ती पुढें चालूं लागतो, तद्वतच तुमच्या स्वतंत्र विचारांनीं समाजाचें मर्मस्थान साधलें कीं समाज जागृत होऊन पुढें गेलाच पाहिजे!




जुनोपंतः -अरे बापरे ! वाघ !

# भित्र्यांची कोल्हेकुई

तुम्ही नवे धाडसी विचार जगापुढें मांडलेत कीं सारेच लोक त्यांचे स्वागत करतील हें केव्हांही शक्य नाहीं. जुने ते सोने म्हणणारीं कांहीं माणसें प्रत्येक समाजांत असणारच. या माणसांना नव्या विचारांची नेहमीं भीति वाटत असते. कोणतीही नवी कल्पना समाजांत रुजू लागली, कीं त्यांना वाटतें आतां लवकरच प्रलयकाल ओढवणार.

गंमत अशी की प्रत्येक नव्या सुधारणेच्या वेळीं "आतां समाज रसातळाला जाणार"! असा आरडाओरडा पुराणमतवाद्यांनीं केला आहे, आणि त्यांच्या भविष्याप्रमाणें समाज केव्हांही रसातळाला गेलेला नाही!

आज घटकेला जे आचारविचार जुने म्हणून पुराणमतवादी समजतात ते तरी पहिल्यापासून जुनेच, म्हणजे अनादि का आहेत? त्यांचाही आरंभ केव्हां तरी 'नवे आचार' म्हणूनच कोणातरी नवमतवाद्यानें केव्हां तरी केला. म्हणजे, आजचा पुराणमतवादीसुद्धां एक प्रकारे नवमतवादीच होय. फरक एवढाच, कीं त्याला जरासं वापरलेले नवें हवें असतें. एखाद्या कोऱ्या करकरीत नव्या कल्पनेचें पिल्लं दिसल्याबरोबर तो वाघ वाघ म्हणून ओरडतो!

---




तरुण प्रेक्षकः–आजोबा, गाडी थांबवायचा का आपला विचार आहे ?

# कल्पनेचें सामर्थ्य

विचार अगर कल्पना म्हणजे निसर्गांतील एक मोठी शक्ति होय. कल्पनांना एकदां चालना मिळाली, की समाज-सुधारणा एखाद्या अग्निरथासारखी वेगानें चालूं लागते. अशा वेळीं आगगाडीनें जमीन हालावी तशी समाजाची बसलेली घडी हदरूं लागते, वादविवादचे वारे सुटतात, नव्या कल्पना प्रज्वलित झाल्यामुळे त्यांच्या ठिणग्या उडतात, आणि उगीच भेदरून जाणाऱ्या माणसाला वाटतें समाजाची गाडी आतां खड्ड्यांत पडणार!

अशा वेळीं जे जुन्याचे अभिमानी असतात ते परंपरेचा आणि रूढीचा जुना मोडका तोडका बावटा दाखवून वेगानें निघालेली सुधारणा रोखून थांबवण्याचा प्रयत्न करतात.

याबद्दल त्यांच्यावर रागावण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण त्यांच्याही प्रयत्नाच्या बुडाशीं सद्हेतूच असतो. एवढेच कीं, त्यांच्या ठिकाणीं वस्तुस्थितीचें अज्ञान असतें. गाडी जोरांत निघाली आहे इतकेंच ते लक्षांत घेतात. त्या गाडीपुढेंही व्यवस्थित आखलेला पक्का मार्ग आहे, त्या गाडीलाही सारथी आहे, आणि ब्रेकही आहेत या गोष्टी त्यांच्या लक्षांत येत नाहींत. त्याला कोण काय करणार?




कापाकाप नव्हे: लागवड

# नवमतांची कलमें

विचार आणि विचारांचें दृश्य फल या गोष्टी कांहीं अशा नाहींत, कीं या हातानें द्याव्या आणि त्या हातानें लगेच घ्याव्या.

जे विचारवंत असतात त्यांना पक्कें माहित असतें, कीं नव्या कल्पनांची थोरवी त्यांच्या तात्कालिक परिणामांनीं मोजू नये. किंबहुना, नव्या कल्पनांचे तात्कालिक परिणाम थोडेसे भीतिदायकच असतात. कारण, कोणती तरी जुनी कल्पना छाटून तिच्यावर आपण नव्या कल्पनेचें कलम करीत असतों. त्यामुळें संहार तेवढा ताबडतोब दिसतो.

त्या संहाराकडे बोट दाखवून भित्रा मनुष्य साहजिकपणेच बावरतो, व इतरांना भ्रमांत पाडतो.

पण तुम्ही हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं जुन्याची छाटाछाट केल्यावांचून नव्याची वाढ कधींच होणार नाहीं. धर्म, शिक्षण, व्यापार, व्यवहार या सर्व क्षेत्रांत अनेक विचारवंतांनीं अनेक वेळां अशी छाटाछाट केलेली आहे; आणि अशा छाटाछाटीचे अंतीं जे चांगले परिणाम झाले आहेत त्यांच्याच पोषक फलभारावर आज समाज थोड्या फार सुखासमाधानांत रहात आलेला आहे.

---




हट्टी रोगी.

## नवा काळ, नवे विचार

कोणत्याही व्यक्तीला अगर समाजाला जेव्हां प्रतिकूल परिस्थिति प्राप्त होते तेव्हां स्वतःच्या विपन्नावस्थेचें सारें खापर परिस्थितीवर फोडून माणूस नेहमीं मोकळा होतो. "काळ उलटला", "दिवस कठीण आले", "या कलियुगाला करणार काय?" हे व असले उद्गार आपल्याला नेहमीं ऐकूं येतात.

पण तुम्ही हें पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं यशाचा काय किंवा अपयशाचा काय, सगळा वांटा परिस्थितीकडे द्यावयाचा नसतो. काळ हा सदाच परिवर्तनशील असतो. सगळेच दिवस सारखे राहूं लागले तर मानवी जीवितांतली अर्धीअधिक गंमत नाहींशी होईल. मनुष्याची परिस्थिति नेहमीं बदलत असते हें तर खरेंच, परंतु प्रत्येक नव्या परिस्थितीबरोबर नव्या आचारविचारांची योजना जर माणसानें केली तर ती जाचक होण्याचा संभव फारसा उरणार नाहीं.

प्रत्येक नवी परिस्थिति वास्तविक पाहतां माणसाच्या कानांत हळूंच सांगत असते, कीं, "तूं आपल्या विचारांत अमुक तऱ्हेचा बदल कर." तिची ही सूचना आपण ऐकत नाहीं म्हणून तिच्यांत व आपल्यांत झगडा उत्पन्न होतो, आणि एखाद्या हट्टी दुखणाइताप्रमाणें आपल्याला कण्हत पडावें लागतें.

जो मनुष्य आणि जो समाज नवी परिस्थिति ओळखून आपल्या आचारविचारांत अवश्य तो फरक करावयास तयार असतो त्याचें सुख सहसा कमी होणार नाहीं.

---




बसतील ते तगतील.

# संसाराची चाळण

उमरखय्यामनें म्हटलें आहे कीं, संसार हा एक सारीपट आहे, व आपण माणसें त्या पटावरच्या सोंगट्यांसारखीं असून दैव नांवाचा द्यूतकार आपल्याला पुढे मागें सरकवीत आहे.

पण असे कां म्हणावयाचें ?

खरें म्हणजे असें कीं, तुम्ही आम्ही सगळेजण संसाराच्या अजस्र चाळणींत बसलेलों आहोंत. या चाळणीला संकटांचे आणि विपत्तीचे धक्के बसत आहेत. आपल्यापैकीं जे लेचेपेचे असतील ते या चाळणींतून पडतील, व दुःखांत आणि अपयशांत गटंगळ्या खातां खातां त्यांची स्थिति अनुकंपनीय होईल. पण, हा दोष त्यांचा आहे; संसाराचा नाहीं.

तुम्ही मनानें व शरिरानें भक्कम असाल तर संसाराची चाळणी कितीही हालली तरी तुमचें आसन कायम राहील!

कोणा एका संताची अशी गोष्ट सांगतात, कीं तो एकदां संतांच्या एका मेळ्यांत शिरला, व प्रत्येकाच्या डोक्यावर प्रहार करून म्हणाला, "कोणते मडके पक्के व कोणते कच्चे तें तपासून पाहतो."

या आख्यायिकेत फार मोठे मर्म आहे.

तुम्ही स्वतः सामर्थ्यवान् असाल त्या मानानें या संसाराच्या चाळणींत तुमचा टिकाव लागेल!

---




जुनाट पडक्या घराचा खोटा अभिमान.

# दुरुस्तीवांचून सुरक्षितता नाहीं

समाजाची रचना परमेश्वरानें केली, आणि त्यानें जी ती एकदां केली तिच्यांत कालत्रयीं बदल होतां कामा नये हें म्हणण्याचे दिवस आतां गेले. समाजरचना मनुष्यकृत असते हे ओळखलें पाहिजे. कोणे एके काळीं माणसाला वाटलें, कीं थंडीवाऱ्यापासून स्वतःचें रक्षण करण्यासाठीं चार भिंतींचें घर बांधलें पाहिजे. त्याचप्रमाणे कोणे एके काळीं माणसांना वाटलें, कीं आपलें जीवित शक्य तितकें अधिक सुखदायक करण्यासाठीं संघटित समाज निर्माण केला पाहिजे. असें माणसांना वाटल्यावर त्यांच्यांतले चार शाहणे लोक एकत्र बसले व त्यांनीं आपल्या मताप्रमाणें समाजाची विशिष्ट व्यवस्था करून दिली.

पण एकदां चांगले म्हणून बांधलेले घर कितीही काळ लोटला तरी चांगलेंच राहील असें समजणें ज्याप्रमाणे वेडेपणाचे ठरेल त्याचप्रमाणे सामाजिक व्यवस्थेचेंही आहे. समाजव्यवस्था जुनी होत चालली म्हणजे तिच्यांत ठिकठिकाणीं कोत्या व भ्रामक विचारांचीं कोळिष्टकें धरतात, रुढीचे उंदीर नासधूस करीत इकडे तिकडे हिंडूं लागतात, खऱ्या न्यायनीतीचें छप्पर ठिकठिकाणीं उसकटले जाऊन त्यांतून अनेक संकटांचे सर्प आंत प्रवेश करतात.

अशा वेळीं घर जुनें आहे एवढ्याच अभिमानाने त्यांत आळसाने राहणाऱ्या माणसासारखे जो वर्तन करतो त्याच्या वेडेपणाला काय म्हणावें?

---




ढिल्याचा हात का उपयोग ?

# पुढें पाहा

एका इंग्रज लेखिकेनें अमेरिकन स्त्री पुरुषांच्या मनोवृत्तीचें वर्णन करतांना असें म्हटलें आहे कीं "हीं माणसें नेहमीं उद्यांच्या विचारांत गढलेलीं दिसतात!"

मला वाटतें अमेरिकन लोकांची भरभराट दुराग्रहानें खोटी ठरवण्यापेक्षां, किंवा त्यांच्या भरभराटीची दुसरी कांहीं उपपत्ति लावण्यापेक्षां या इंग्रज लेखिकेने निर्दिष्ट केलेल्या त्यांच्या या मनोवृत्तींतच त्यांच्या उत्कर्षाचें खरें बीज आहे असें समजलें पाहिजे.

तुम्हांला सुखी व्हायचें असेल तर गतकालापेक्षां आज उद्यांच्या प्राप्त कालाकडेच लक्ष द्यावयास तुम्ही शिकलें पाहिजे. आपल्या विचारांचा प्रकाश भूतकालावर पाडून पुढें चालण्याची संवय चांगली नव्हे. असें करणें म्हणजे त्या प्रकाशाचा अपव्यय करण्यासारखें आहे.

शिवाय असें कीं गतकालांतील आपल्या सुस्थितीकडे बोट दाखविलें म्हणजे तेवढ्यानें आपली प्राप्त परिस्थिति सुखदायक होते असें थोडेंच आहे? आपल्या पायांखालची वाट कांट्याकुट्यांनीं भरलेली असली तर योग्य विचार व उद्योग करून ती साफसूफ करावी यांतच आपले खरें हित आहे. गतकालांत आपण राजवाड्यांत राहात होतों, आणि त्या वाड्याच्या चौकांतल्या हिरवळीवरून ऐटीनें चालत होतों, असल्या आठवणी करीत बसण्यांत काय फायदा?



आजोबाः -अरेरे काय हा दुष्ट वारा !

# आधी हिंवाळा, आणि मग वसंत

जगांत घडणारी प्रत्येक लहानमोठी गोष्ट प्रक्रियेच्या ( Process ) स्वरूपाची असते. तिच्यामागें कांहींतरी कारणें असतात, व तिचे म्हणून कांहीं विशिष्ट परिणाम घडून यावयाचे असतात. म्हणून, कोणत्याही गोष्टीच्या तात्कालिक स्थूल स्वरूपापेक्षां दूरदृष्टीने तिच्या परिणामांची कल्पना करून मगच ती चांगली किंवा वाईट ठरवावी.

पुष्कळदां असें होतें कीं, वस्तुतः हितकारक असलेल्या स्थित्यंतराचें पहिलें स्वरूप फारसें आकर्षक नसतें. जी शहाणी माणसें असतात तीं या पहिल्या दुश्चिन्हांनीं बिचकून न जातां आगामी हित-परिणामावर नजर ठेवतात. अशी नजर न ठेविली तर निसर्गांत घडून येणाऱ्या कोणत्याही इष्ट क्रांतीचें खरें रहस्य कळणे कठीण होईल. अरुणो-दयापूर्वीचा अंधार, वर्षाकालापूर्वींचा असह्य उन्हाळा, उसाच्या मळ्यांत प्रारंभीं सुटणारी खताची दुर्गंधी, आणि वसंतऋतूंत वृक्षलतांवर बहरणाऱ्या कोवळ्या पालवीच्या तयारीसाठी आधीं सगळी वृक्षसृष्टि पर्णशून्य करणारा हिंवाळा—हीं असल्या क्रांतींचीं उदाहरणे होत.

विचारक्रांतीचेही असेच आहे. धर्मवृक्षाच्या छायेखालीं समाजाला सतत सुखाची शांति लाभावी असाच तो वृक्ष ज्यांनीं प्रथम लावला त्यांचा हेतू होता. या वृक्षाला ऋतुमानाप्रमाणे नव्या कल्पनांची पालवी फुटावी हेंच उचित होय, व त्या पालवीला अवसर मिळण्यासाठीं जीर्ण रसशून्य झालेलीं पिकलीं पानें गळून पडावींत हेंही अपरिहार्य होय.

जे आकुंचित दृष्टीचे असतात त्यांना वाटते हिंवाळ्यांतील सोसाट्याच्या वाऱ्यांनीं जुनी पालवी नाहींशी केली, कीं वृक्षच नाहींसा होणार ! पण, वृक्ष नष्ट होण्याऐवजीं नवीन पल्लवसंभाराने तो विभूषित व्हावयाचा असतो हें आपण कधीं विसरूं नये. “If winter comes, can spring be far behind ?” या सुभाषितांत फार मोठें मर्म **सांठवलेलें आहे.**




छत्री जवळ असतां पावसाळ्याला कां भितां ?

## फुगूं नका, खचूं नका

स्वतःची कर्तबगारी माणसांना कळत नाहीं याला दोन कारणे आहेत.

अहंकार म्हणत असतो, " अरे बेट्या, तूं काय लहानसहान असामी आहेस ? तुझें कुळ केवढे थोर ! तुझी विद्वत्ता किती अगाध ! तुझे सामर्थ्य किती मोठे ! खरें म्हणजे शिकंदरासारखा तूं जगज्जेता व्हायचास ! " आणि अशा प्रकारे अहंकारानें चढविलेल्या माणसाला अपयशाचा पहिला रट्टा मिळाला, कीं तो कायमचाच जमीनदोस्त होतो.

याच्या उलट पुष्कळ माणसांची प्रगति त्यांच्या मनांतल्या खोट्या भीतीमुळें खुंटलेली असते. हीं माणसें कांहींही काम करावयास निघालीं कीं, त्यांची भीति त्यांना मागें खेंचीत हळूंच म्हणते, " अरे बाबा, हे काम तुझं नाहीं. तुझ्या अंगीं विद्या आहे, कां सामर्थ्य आहे, आहे तरी काय ? "

म्हणून तुम्हांला स्वतःचें कल्याण साधायचें असेल तर अहंकाराच्या अगर भीतीच्या आरशांत स्वतःचे प्रतिबिंब कधींही पाहूं नका. कोणत्या तरी कामाला प्रत्यक्ष आरंभ करा, आणि जें काम तुमच्या हातून घडेल त्यांतच स्वतःचें प्रतिबिंब पहावयास शिका.

---




दीडशहाणा पतंगवाला.

# निरुत्साहाची धोंड

एखादें काम आपल्या हातून पार पडलें नाहीं तर त्याचा खेद करीत बसण्यापेक्षां तें कां पार पडले नाहीं याचा विचार करणें अधिक हिताचें असतें.

कारण, बहुतेक असें होते कीं, हातीं घेतलेल्या कामांत आपण पूर्ण लक्ष घालीत नाहीं म्हणून तें फसतें. केवळ कशी तरी वेठ पार पाडायची म्हणून आपण काम करतों; आणि साहजिकपणेच निरुत्साहाची धोंड आपणच आपल्या कामाच्या गळ्यांत बांधल्यानें तें असाध्य होऊन बसतें.

अभ्यास होत नाहीं म्हणणारा विद्यार्थी, लेखनकला साधत नाहीं म्हणणारा नवशिका लेखक, कचेरींतील कामाबद्दल वरिष्ठांचीं बोलणीं खाणारा नोकर, किंवा कोणीही नोकरी देत नाहीं म्हणून हताश होणारा तरुण—या सगळ्यांच्या हातून बहुधा एकच चूक होत असते. जें करायचें ते उत्साहानें केले पाहिजे ही गोष्ट ते विसरतात; आणि अपयशाचें खापर फोडतात कामाच्या डोक्यावर!

पण, पतंगाच्या शेपटीला आधीं लोखंडाचा जड गोळा बांधून पतंग उंच उडत नाहीं म्हणून तक्रार करणाऱ्या माणसाला सुज्ञ कोण म्हणेल?

---




रूळ चालू ठेवा, कुत्र्यांनीं कितीही गोंगाट केला म्हणून काय होणार ?

# उद्योगी माणसाचे चार शत्रू

उद्योगी माणसाचे चार जन्मजात शत्रू आहेत.

जे मूर्ख असतात त्यांना त्याच्या उद्योगाची किंमत कळणें शक्य नसतें.


जे मत्सरी असतात त्यांना वाटतें, कीं वास्तविक आपली धांव केवढी मोठी ! जग आपले कौतुक करण्याऐवजीं या माणसाचा काय गौरव करीत आहे ?

जे कुत्सित असतात त्यांचा एक डोळाच निसर्गानें फोडलेला असतो. त्यामुळें त्यांना दुसऱ्याचे दोष तेवढे चटकन् दिसतात, आणि तेच दोष दुसऱ्यांना दाखवायसाठीं ते धडपडत असतात.

या तीन वर्गाच्या भरतीला समाजांत नेहमीं एक चौथा वर्ग असतो. तो वर्ग म्हणजे टीकाकारांचा. हे लोक स्वतः हातांनीं कांहीं करीत नाहींत, पण कांहीं करूं तर आम्हींच करूं अशी घमेंड यांच्या ठिकाणीं भरपूर असते. अर्थात् दुसऱ्याच्या कृतीला चांगले म्हणायची वेळ आली तर पोटचे पोर मेल्यासारखें त्यांना दुःख होतें.

म्हणून शहाण्यानें या चार वर्गांच्या कुत्तेकुईकडे लक्ष न देतां आपला उद्योग मनाशीं योजलेल्या मार्गानें धीमेपणे हांकावा !

---




उद्योगालाच लक्ष्मी माळ घालते.

# लक्ष्मीचें स्वयंवर

लक्ष्मीचा जन्म कमळांतून झाला आहे असें म्हणतात. पण म्हणून कमळासारख्या नाजुक प्रकृतीच्या, आणि निरुद्योगाच्या आयत्या शेजेवर निजणाऱ्या माणसाला ती माळ घालील अशी अपेक्षा करणे चुकीचें होईल.

लक्ष्मीला सगोत्र विवाह आवडत नाहीं असेंच म्हणाना. ती स्वतः नाजुक गोत्राची आहे, पण सदैव उद्योगांत मग्न असणाऱ्या कणखर गोत्राचाच वरपुरुष तिला नेहमीं आवडतो. तिच्या माहेरीं कमलपत्रावरचे दंवबिंदूचे मोती पुष्कळ आहेत; पण ते तिला आवडत नाहींत. तर ज्या माणसाचा चेहरा निढळाच्या धर्मबिंदूंनीं सुशोभित झाला आहे तोच तिला फार आवडतो.

उद्योगावांचून लक्ष्मी प्राप्त होत नाहीं, आणि झाली तरी ती दीर्घकाल टिकत नाहीं. उलट, जो अविश्रांत उद्योग करतो त्याला कांहीं काळ लक्ष्मीनें अव्हेरल्यासारखें वाटले तरी केव्हां तरी त्याच्या मागून हळूच येऊन ती त्याच्या गळ्यांत माळ घालते हें खास.

---




मोटार खड्ड्यांत घालणारे शहाणे फक्कड.

# विरोधानें करूं नका

या दुनियेंतला एक नियम असा आहे, कीं तुम्ही कोणतेंही सत्कृत्य करूं लागलांत, कीं कोणीतरी तुम्हांला विरोध करायला पुढें आलेंच म्हणून समजा.

पण, दुनियेंतला दुसराही एक नियम आहे, आणि तो विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. तो असा, कीं लोकांच्या विरोधाने गडबडून न जातां त्याला तोंड देऊन तुम्ही युक्तीने पहिला बाण सोडतांच त्या विरोधाचा अक्राळविक्राळपणा नाहीसा व्हावयास लागतो.

लोकमताचा विरोध म्हणजे एक चमत्कारिक राक्षस आहे. तो जितका भेसूर तितकाच भित्रा आहे. " भित्यापाठीं ब्रह्मराक्षस " अशी जी म्हण आहे ती या विरोधाला पुरेपूर लागूं आहे. म्हणून तुमच्या अंगीकृत कार्याला कितीही जबरदस्त विरोध असल्यासारखें वाटलें, तरी तुम्ही थोडेसें धैर्य व चिकाटी दाखवितांच त्या विरोधाचे स्वरूप बदलल्यावांचून राहणार नाहीं, हे लक्षांत ठेवा.

तुमच्या कार्याची आणि विरोधाची पहिली चकमक उडते तीच सर्वांत महत्वाची असते. त्या चकमकींत तुम्ही कच खाल्लीत, कीं तो राक्षस तुमच्या मानगुटीस कायमचा बसलाच म्हणून समजा. उलट, या चकमकींत तुम्ही थोडेंसें धैर्य दाखविलें, की तुम्ही अर्धी लढाई जिंकलीत म्हणून समजा !

---




अवघड काम सोपें करण्याची युक्ति.

# असाध्य काय आहे ?

सगळींच माणसें निसर्गतः सारख्याच सामर्थ्याचीं निपजलेलीं असावींत असें घडणे शक्य नाहीं. माणसांच्या बलाबलांत फरक हा नेहमीं राहणारच; आणि जें काम एकाला साधलें तें दुसऱ्यालाही साधेलच असें म्हणतां यावयाचें नाहीं.

पण उलट पक्षीं असेही विचारतां येईल कीं जी गोष्ट 'अ' ला साधली ती 'ब' लाही कां साधूं नये? तोही 'अ'सारखा माणूसच आहे ना? फरक एवढाच कदाचित् राहील, कीं 'अ'ने जे अल्पसाया-सानें साध्य केले तें साध्य करण्यास 'ब'ला दीर्घोद्योग करावा लागेल.

आणि पुष्कळदां असें होते, कीं माणूस एखाद्या कामाचा उगाच बाऊ करून बसतो. 'हे काम आपल्याच्यान होणार नाही बुवा!' असे म्हणून हातपाय गाळण्याची बहुतेकांची प्रवृत्ति असते.

अशी माणसे थोडीशी महत्वाकांक्षा धरून तिच्या आधारानें उद्योगाची तरफ वापरतील तर कामाचा दगड दुरून वाटतो तितका जड नसतो असें त्यांना आढळून येईल.

———




ही झोंप सुखकर होईल काय ?

# गादी पाहिली, पण तरवार कुठें पाहिली आहे ?

कोणीसें म्हटले आहे कीं, 'उद्योगाच्या घरीं ऋध्दिसिध्दी पाणी भरतात.' पण, जो जन्मजात आळशी असतो त्याला वाटत असतें, उद्योगी माणसापेक्षां आपणच जास्ती सुखी आहोत. खुशाल हातपाय न हालवतां आळसाच्या गादीवर पाय ताणून रात्रदिवस झोंप घ्यायला सांपडली तर त्याहून अधिक मिजास ती कोणती ? तो मनाशीं म्हणत असतो, " उद्योग करून तरी माणसानें चैनीची आणि सुखाचीच तरतूद करायची ना ? मग या तरतुदीसाठीं उद्योगाचा खटाटोप तरी कशाला हवा हो ? उद्योगी माणसाला जे मिळायचें असतें ते आम्ही मिळवतोच कीं ! खुशाल अष्टौप्रहर झोंप ताणायला मिळण्यापलीकडे माणसाला आणखी ते काय हवें असणार ? उद्योगी मनुष्य कसला सुखी, आम्हीच खरे सुखी आहोत !"

पण आळशी माणसाची ही विचारसरणी किती भ्रामक आहे ?

डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजराला वाटत असते, आपल्याला कोणी पहात नाही; पण पाठींत बडगा बसला म्हणजे त्याला साऱ्या गोष्टी उमगतात.

आळशी माणसाचेंही असेच आहे. तो डोळे मिटून गादीवर पडतो खरा, पण दारिद्र्याची नगी तरवार त्याच्या डोक्यावर सदा टांगलेली असते ती त्याला दिसत नाही ! आणि ती त्याला दिसली नाहीं म्हणून ती त्याच्या मस्तकावर पडून त्याचा सर्वनाश केल्यावांचून रहातही नाहीं.




रुसवी मैना.

# आळसाचें फोलपट

उद्योगी माणसाला असाध्य असे कांहीं नाहीं हे जसे खरें, तसेच आळशी माणसाला साधी गोष्टदेखील असाध्यच राहील हेदेखील खरे.

आपल्या अंगच्या कर्तबगारीला नेहमीं उद्योगाचा सुंदर चारा दिला तरच ती आपल्या हातीं राहून तिचें कर्णमधुर संगीत ऐकावयास मिळते. हा चारा तिला न देतां एकदां कां तिला आपल्यावर रुसून हातची घालविली, कीं ती पुन्हां आपल्या हातीं येणे कठीण. आळसाच्या फोलपटावर रुसून उडून गेलेली ती मैना मग आपण कितीहि चुचकारले तरी आपल्यावर प्रसन्न व्हायची नाहीं.




" काय करावं ? कुठं चिटपांखरूंही दिसत नाहीं ! "

# लक्ष ठेवा, कीं संधी हव्या तेवढ्या आहेत


माणसाला कांहीं करून दाखवायचे असलें तर त्याला अनुकूल संधि मिळाल्याशिवाय सारे व्यर्थ होय हा सिद्धांत कांहीं खोटा नाहीं. पण, या सिद्धांताचा आश्रय करून आपल्या आळसाचें आणि मूर्खपणाचे समर्थन मात्र माणसानें करू नये. कारण असें, कीं "मला संधीच नाहीं! मला संधीच नाहीं!" असे रडगाणे गाणाऱ्या व्यक्तींच्या बाबतींत खरा प्रकार घडतो तो निराळाच असतो. त्यांना संधि मिळालेली नसते असे नव्हे, तर आलेली संधि त्यांनीं डोळसपणें पाहिलेली नसते.

योग्य संधीशिवाय काम साधत नाहीं असें म्हणणे तर भागच आहे. पण, संधि असो नसो, सारखें काम करीत राहिल्याखेरीज कोणती संधि योग्य होती ते कधीं कळतच नाही.

पक्षी कां कधीं शिकाऱ्यापुढे येऊन म्हणतो कीं, "हा मी तुझ्यापुढं येऊन बसलो आहे रे; ओढ आंत बंदुकीचा चाप!"

आपल्या बंदुकीच्या नळीवर येऊन बसलेले पक्षी ज्याला दिसत नाहींत, आणि त्यांजकडे पाठ फिरवून जो रान न्याहळीत राहतो त्या शिकाऱ्याला हात हालवीत जावे लागलें तर त्यांत दोष कोणाचा?

---




गेल्याचा शोक वृथा !

# संधी कधीं संपत नाहींत

इंग्रजींत अशी म्हण आहे, कीं माणसानें सांडलेल्या दुधाबद्दल रडत बसूं नये. या म्हणींतला उघडच अभिप्राय असा, कीं दूध सांडले म्हणून मनुष्य कितीही रडला तरी ते परत कां येणार आहे? ते गेलें तें गेलेंच.

आणि ज्या माणसाच्या जवळच अगदीं मालकीची दुभती परिपुष्ट गाय उभी आहे त्याने सांडलेल्या दुधाबद्दल आक्रोश करणे म्हणजे तर मूर्खपणाचा कळसच म्हटला पाहिजे. त्या गायीची धार काढून सांडलेल्या दुधाची भरपाई करून घ्यावी हेच त्याचे खरे कर्तव्य होय.

तुमच्या आयुष्यांत ज्या संधी येतात त्यांचेही असेच आहे. प्रत्येक संधीचा तुम्हीं जागरूकपणाने फायदा घ्यावा हे सगळ्यांत अधिक शहाणपणाचे होय. पण आळसाने म्हणा अगर अज्ञानाने म्हणा, आलेल्या चांगल्या संधी तुम्हीं जाऊं दिल्या तरी उमज पडल्यावर गेलेल्या संधीबद्दल शोक न करता लगेच पुढची संधि साधावी हे त्याच्या खालो-खालचें शहाणपण होय.

इंग्रजींत अशी एक म्हण आहे, कीं समुद्रांतून लोकांनीं आजपर्यंत लाखो मासे काढून नेलेले असले तरी त्यांत अजूनही हजारों मासे आहेतच! काळ हा समुद्रासारखाच आहे. त्यांत प्रत्येकाच्या उपयोगी अशा किती तरी संधी नेहमीं सांपडण्यासारख्या असतात. ज्या संधी गेल्या त्याबद्दल रडण्याऐवजीं आता पुढे जी संधि येईल तिचा फायदा आपण अवश्य घेणारच असा निश्चय माणसानें करावा.




दीडशहाणा फोटोग्राफर.

# न[illegible] पाहाल तर आनंदाला तोटा नाहीं

कांहीं माणसें सदा दुर्मुखलेलीं असतात. त्यांना जगातला आनंद पार मावळल्यासारखे वाटतें. इतर माणसें आनदांत कशी राहतात हेच त्यांना कळत नाहीं.

पण, त्यांच्या या वृत्तीचें खरें कारण त्यांच्या आजूबाजूस आनंदाकारक गोष्टी घडत नसतात हे नव्हे, तर त्या गोष्टींकडे ते पाठ फिरवून उभे असतात हे होय.

गत कालाबद्दलचा खेद, आणि भावी कालाबद्दलची चिंता हे खरोखरच नवरा बायकोच्या जोडप्यासारखे एक जोडपे आहे. त्यांपैकीं एकाला थारा दिला कीं दुसरें पात्र त्याच्या मागोमाग आलेच म्हणून समजा. ज्या माणसाला गतगोष्टीचा व्यर्थ शोक करण्याची संवय लागली त्याला पुढच्या गोष्टींचीही चिंता केल्यावांचून राहवत नाहीं.

शहाण्या माणसांनीं या जोडप्याच्या नादीं कधीं लागूं नये. जगांत आपल्याभोवतीं किती तरी प्रकारचा आनंद सदा नाचत बागडत असतो. तो ओळखण्याची, आणि उपभोगण्याची चतुराई ज्याच्या ठिकाणीं आहे त्याच्या आनंदांत कधींही उणीव पडणार नाहीं.

---





दुबळा वाटसरू.

# कुविचारांचे दोरखंड तोडा

माणसाच्या शरीराला जशी सात्विक आनंदाची गरज आहे तशीच मनाला तेजस्वी विचारांची गरज असते. पराक्रमी मनुष्य आपल्या मनांत दुबळेपणाचे विचार कधीं येऊं देत नाही.

कारण, दुबळ्या विचारांचा पाश मोठा कठीण आहे. आपण निःशक्त आहोत, क्षुद्र आहोत असें आपणच घोकत बसलों, कीं आपल्या हातून कांहींदेखील होणें शक्य नाहीं. एखाद्या चांगल्या धट्याकट्या माणसाला मेस्मेरिझमचे प्रयोग करणाऱ्याने सांगितलें कीं, "तुझे दोन्ही हात लुले झाले आहेत. तुला आतां टाळी वाजवतां येणे शक्य नाही" म्हणजे काय होते? खरोखरच त्या माणसाला टाळी वाजवतां येत नाहीं! त्याचे हात लुले झालेले असतात काय? नाहीं. पण तशी तो कल्पना करून घेतो, आणि दुबळ्या विचारामुळे तो खरोखरीच दुबळा होतो.

म्हणून तुम्हांला उत्कर्षाचे स्थान गांठावयाचे असेल तर दोन गोष्टी लक्षांत ठेवा. पहिली गोष्ट अशी, कीं उत्कर्षाचा मार्ग हा नेहमीं चढणीच्या वाटेसारखा असतो; आणि दुसरी गोष्ट अशी, कीं अशा चढणीचा मार्ग चढून जातांना शहाणा माणूस आपल्या अंगावरचे सारे पाश आधीं टाकून देत असतो. या जगांत शंभरापैकीं एखादाच मनुष्य उत्कर्षाच्या वाटेने झपाझप पुढे जातो, आणि नव्याण्णव मागे रेंगाळतात, अगर थकून पडतात याचे कारण या नव्याण्णवांच्या अंगीं सामर्थ्य नसतें असें नव्हे, तर दुबळ्या विचारांचे दोरखंड तोडून टाकण्याची सावधगिरी ते ठेवत नाहींत हें होय.




हें चित्र आणि तें चित्र.


# शर्यत जिंकण्याचें रहस्य

दुबळे विचार जसे वाईट त्याप्रमाणें गैरहिशोबी कल्पनाही वाईट.

तुम्हांला जो धंदा करायचा असेल तो लहान असो अगर मोठा असो, त्याबद्दलच्या चुकीच्या कल्पना तुम्ही मनांत येऊं दिल्या, कीं तुमचा नाश झालाच म्हणून समजा. समजा, एखाद्या शहरांतल्या एखाद्या विवक्षित वस्तींत तुम्हांला दुकान काढायचे आहे. अशा वेळीं त्या भागांत कोणत्या प्रकारचे लोक राहतात, त्यांच्या गरजा काय आहेत, त्यांच्या आवडी निवडी कोणत्या आहेत, त्यांचें सांपत्तिक सामर्थ्य किती आहे, त्यांना नेहमीं लागणारा माल जास्तींत जास्त किफाइतीनें कोठे खरेदी करतां येईल या सर्व गोष्टींबद्दल बिनचूक माहिती तुम्ही मिळविली पाहिजे. ती न मिळवितां भलत्याच कल्पनांनीं प्रवृत्त होऊन तुम्ही दुकान थाटलें, कीं अपयश तुमच्या पदरीं आलेंच म्हणून समजा.

जगांत पुष्कळ माणसें अपयशाला जखडलेलीं दिसतात याचें कारण काय बरे ? एकच कीं, या माणसांनीं आपल्या उराशीं चुकीच्या कल्पना घट्ट धरलेल्या असतात, आणि अल्पसंतोषाची पट्टी डोळ्यांवर बांधलेली असते. त्यामुळें हळुं हळुं स्वतःचा आत्मविश्वास त्यांना दिसेनासा होऊन ते यशाला कायमचे पारखे होऊन बसतात.

---




चा रे कुटुंब !

# असंगाशीं संग


तुकाराम महाराजांचें लग्न एका अगदीं अजाण, पोरकट आणि हट्टी स्त्रीबरोबर झालें होतें व त्यामुळें त्यांच्या परमार्थसाधनाच्या मार्गांत अनेक संकटें येत होतीं असें एका नाटकांत दाखविलेलें मी पाहिलें आहे.

यांत ऐतिहासिक सत्य कितपत आहे मला माहित नाहीं. कदाचित् फारसे नसेलही, आणि ती केवळ एखाद्या कवीची एक व्याजोक्ति असेल. पण, ती व्याजोक्ति असली तरी मोठी अर्थपूर्ण आहे येवढें खास.

कारण, 'असंगाशीं संग अन् प्राणाशीं गांठ' म्हणतात ना, तें अज्ञानाच्या बाबतींतही अक्षरशः खरें आहे. ज्या व्यक्तीनें अगर समाजाने अज्ञानाची कायमची सोबत पत्करली त्याची दुर्दशा कांहीं विचारायला नको.

कारण, अज्ञानाच्या डोक्यावर परावलंबनाची पाटी बसायची हें सदा ठरलेलें, आणि अज्ञानाच्या खाकोटीला नाना प्रकारच्या जाचक रूढींचें बोचकें असायचें हेंही ठरलेलें!

---




अज्ञानें रस्ता कसा सांपडणार ?

# दाखले पाहूं नका, नवा रस्ता पाहा

हल्लीं पुष्कळ सुशिक्षितांचें लक्ष व्यापार धंद्याकडे वळलें आहे. मी 'बिझिनेस' करतों, असें कांहींशा ऐटीनें सांगणारे तरुण वारंवार भेटतात. त्यांची ती ऐट एका दृष्टीनें समर्थनीय आहे. मनाने दुर्बल, आणि महत्वाकांक्षेनें पंगु बनविणाऱ्या पुस्तकी शिक्षणापेक्षां व्यापारधंद्याकडे आपल्या समाजाचें लक्ष जितकें अधिक वेधेल तितकें हवेंच आहे.

परंतु, 'मी बिझिनेस करतों' असें प्रारंभीं हौसेनें सांगणाऱ्या तरुणांपैकी शेकडा नव्वदांच्या बाबतींत असें होतें, कीं अल्पावधींतच त्यांच्या पदरीं अपयश येतें, आपला मार्ग खुटल्यासारखें त्यांना वाटते, आणि मग व्यापार धंद्यांत अर्थ नाहीं असें ते म्हणूं लागतात.

या प्रकाराचा खरा दोष कोणाकडे बरें?

धंद्याकडे कीं धंदा करणाऱ्यांकडे?

अशी एक म्हण आहे ना, कीं प्रतिष्ठा ही धंद्यावर अवलंबून नसून तो करणारा कसा वागतो त्यावर अवलंबून आहे? यशापयशाचें असेंच आहे. ते दहा टक्के धंद्यावर तर नव्वद टक्के तो करणाऱ्याच्या पद्धतीवर अवलंबून आहे.

धंद्यांत शिरणारी बहुतेक माणसें जुन्या धोपट मार्गाने जाऊं पाहातात. धंद्यांतसुद्धां पुस्तकी ज्ञानाबरहुकुम ते वागूं लागतात. जुन्या काळचे व्यापारी कसे वागत होते त्याचा दाखला पुस्तकांत पाह्यचा आणि वागायाचें, अशी त्यांची तऱ्हा असते. त्यांना अपयश येतें तें या कारणानेंच.

व्यापारधंदा करणारानें तर काळाच्या प्रगतीकडे सारखी नजर ठेवली पाहिजे. आपल्या धंद्यांतल्या प्रत्येक गोष्टींत नवी नवी सुधारणा करीत राहिले पाहिजे, आणि त्या त्या धंद्यांतल्या निष्णातानीं जे आधुनिक मार्ग दाखविले असतील त्या मार्गांची उपेक्षा करतां कामा नये. असें केल्यावर यशोमंदिराची वाट चुकणें शक्यच नाहीं.

---




कोणत्या प्रकाशाचा उपयोग करून घेणार ?

# पायापुरतें पाहूं नका

व्यापार धंद्यांत काय अगर आयुष्यांत काय माणसानें आपला दृष्टिकोन विस्तृत ठेवला पाहिजे. आपल्या दुकानांत, आपल्या घरांत, किंवा आपल्या लहानशा समाजांत जें घडते तेवढेच मी पाहीन, आणि तेवढ्यावरूनच युक्तायुक्त गोष्टींचा निर्णय करीन, असें म्हणणारा माणूस अगर समाज आत्मघात करून घेतो, आणि अंतीं वेडा ठरतो.

आमच्या पूर्वजांनीं सांगितलें त्यांतच सारें शहाणपण सांठवलें आहे असें जीं माणसें म्हणतात तीं समाजाला अधोगतीस नेतात. सबंध जगांत काय उलाढाली चालल्या आहेत, कशी कशी क्रांति होत आहे, व त्यावरून आपल्याला काय बोध घेतां येण्यासारखें आहे तें पहाण्याची जो जागरुकता ठेवतो त्याचाच धंदा आणि संसार सुखाचा होतो. उलट एकंदर जगाच्या अनुभवाचा झगझगीत प्रकाश सोडून जो आपल्या अकुंचित अनुभवाची मिणमिण जळणारी एवढीशी दिवटी घेऊन चालूं पहातो तो सदा ठेंचकाळत आणि चांचपडतच जाणार !

---




वेडा कुत्रा.

# चिकाटी

अल्पसंतुष्टता हा तर दुर्गुण खराच; पण अविचारी नाचरेपणा हासुद्धां तितकाच मोठा दुर्गुण आहे.

दारिद्र्यांत आणि कष्टांत खितपत पडलेल्या पुष्कळ माणसांच्या बाबतीत असे म्हणतां येईल, कीं त्यांनी धाडस दाखविले नाहीं म्हणून त्यांची तशी गत झाली. पण उलट इतर कित्येक लोकांच्या हाल-अपेष्टांचें कारण असें असतें, कीं त्यांनीं योग्य ती चिकाटी दाखविलेली नसते.

केवळ एकाच धंद्याला अगर नोकरीला सतत चिकटून राहिले म्हणून मोठे झाले असे कितीतरी लोक दाखवितां येतील. मोठी नोकरी दिसल्याबरोबर हुरळून जाऊन चालू नोकरी सोडण्यापूर्वी माणसानें विचार करावयास पाहिजे. व्यापार धंद्याचेंही असेच आहे. दुसऱ्याचा मोठा व्यापार धंदा पाहून त्याची नक्कल करण्याच्या बुद्धीने आपला लहानच कां होईना, पण नीट सुरळीत चाललेला धंदा सोडणारा वेडा ठरायचा संभव फार. पाण्यांतल्या प्रतिबिंबांतली भाकरी पकडण्याच्या प्रयत्नांत आपल्या तोंडांतली भाकरी गमावून बसणाऱ्या कुत्र्याची गोष्ट कधींही विसरूं नये.

---




कित्येकांची आपल्या वजनाबद्दल विलक्षण कल्पना असते.

## ॥ अभिमान असावा, पण गर्व नसावा

नोकरी करतांना माणसानें हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं ज्या संस्थेची नोकरी आपण करतों तिचा नांवलौकिक जितका वाढेल तितकी आपल्या नोकरीला प्रतिष्ठा येईल, आणि आपण जितक्या कसोशीने आणि प्रामाणिकपणे काम करूं तितका संस्थेचा नांवलौकिक वाढेल.

संस्था ही व्यक्तीपेक्षां केव्हांही अधिक जुनी आणि अधिक दीर्घायुषी असते. अनेक व्यक्तींच्या परिश्रमांनीं तिला थोरवी आलेली असते. ती थोरवी अधिकाधिक वाढविणे हेच संस्थेच्या प्रत्येक नोकराचें खरें कर्तव्य होय. आपल्याकडे संस्था टिकत नाहींत याचे कारण उपरोक्त सिद्धांताची जाणीव संस्थेत काम करणारीं माणसे ठेवीत नाहींत हेंच होय. संस्थेच्या प्रत्येक नोकराने संस्थेशीं स्वतःचें एक प्रकारचें तादात्म्य मानलें पाहिजे. सामाजिक प्रतिष्ठेच्या आणि मान्यतेच्या कांट्यावर संस्थेच्या नांवलौकिकासकट उभे राहून जे आपले वजन ठरेल तेच खरें हें सदैव लक्षांत ठेवण्यांतच नोकराचें हित असते.

---




वर चढणें अथवा खालीं उतरणें हें आपल्या कृतीवरच अवलंबून नाहीं काय ?

# ज्याचें नशीब त्याच्या हातांत

'सुखकर्ता, दुःखहर्ता' असे म्हणून एखाद्या देवाची आरती करण्यांत यत्किंचितही शहाणपणा नाहीं. माणसाला सुखाच्या शिखरावर चढवणारा, अगर दुःखाच्या गर्तेत लोटणारा कोणीही देव नाही. असल्या देवाची दुबळी कल्पना तुम्ही जितक्या लवकर सोडाल तितके तुम्ही अधिक सुखी व्हाल.

माणसाला मिळणारें यशापयश त्याच्या एकट्याच्या प्रयत्ना-इतकेंच इतर अनेक अनुकूल प्रतिकूल गोष्टींच्या संयोगावर अवलंबून आहे हें तर कबूल केलेच पाहिजे. पण, याबद्दल अधिक खोल विचार केला तर तुम्हांला हेंही पटेल, की अनुकूल गोष्टींची संख्या वाढविणें, आणि प्रतिकूल गोष्टींची कमी करणें हेंही पुन्हां प्रयत्न करणाऱ्याच्या शहाणपणावर व उद्योगावर थोडेंतरी अवलंबून असतेच. जो अधो-गतीस जातो तोही आपल्या गुणांनीं आणि जो उन्नतीस चढतो तोही आपल्या गुणांनींच.

---




शेख महंमद.

# नुसत्या मनोराज्यांनीं सिद्धि मिळत नाहीं

'All great men are dreamers' असे इंग्रजींत एक सुभाषित आहे. याचा अर्थ असा कीं, थोर विभूतींना सदा कसलीं तरी अलौकिक सुखस्वप्नें पडत असतात. पण यावरून जर असें कोणी म्हणेल, कीं मनाशीं सुचतील तीं मनोराज्ये करणें हेंच सुखाचें आणि यशाचें खरें साधन तर तें निखालस वेडेपणाचे ठरेल. सिगरेटचीं पाकिटें फस्त करून घरांतल्या घरांत तक्क्याला टेकून, आणि पाय पसरून स्वप्नांत काळ घालविणारा मनुष्य आयुष्याच्या अखेरीपर्यंत तसाच तक्क्याला टेंकून पडलेला रहाणार. तो नांवारूपाला चढणे शक्यच नाहीं.

अलौकिक माणसाला इतरांना पडत नाहींत अशीं अलौकिक स्वप्नें पडतात हें तर खरेंच, पण तीं स्वप्नें खरीं करून दाखविण्यासाठीं तीं माणसें अलौकिक अट्टाहास आणि उद्योग करतात हें त्याहूनही अधिक खरें, हें प्रत्येकानें लक्षांत ठेवण्यासारखे आहे.

---




चाकोरींत अडकूं नका.

# स्वावलंबन

विज्ञानशास्त्राचा असा एक नियम आहे, कीं कोणतेंही कार्य फुकटाफाकट होत नाहीं. एका जातीची शक्ति खर्च करावी तेव्हांच दुसऱ्या जातीची शक्ति उत्पन्न होते.

ह्याच नियम मानवी आयुष्याला लागूं आहे. सुख अगर कीर्ति माणसाला फुकटाफाकट कधींही मिळत नाहीं. त्याबद्दल कसलें तरी मोल त्याला द्यावेंच लागतें. अग्नि निर्माण करायचा असेल तर घर्षण घडले पाहिजे. तद्वतच मोठेपणा मिळवायचा असेल तर माणसाने सदा जागरूक राहून आपल्या कामाची दिशा आपली आपण आखली पाहिजे. यांत कुचराई केली, कीं घात झालाच म्हणून समजावें. आयुष्याचा गाडा ठराविक चाकोरींतून सोडला, कीं माणसाला झोप घेतां येते हें खरे, पण अखेर त्याचा विनाश होतो हें विसरून चालावयाचें नाहीं.




गंमतीनें बोलावली, पण कृत्या होऊन मागें लागली.

# दुष्ट संवयी

हिंस्र पशूंवर मनुष्याने विजय मिळविलेला आपण पहिला, कीं त्याचे श्रेय आपण चटकन माणसाच्या धैर्याला व चातुर्याला देऊन टाकतों. वास्तविक पाहिलें तर मात्र हिंस्र पशू माणसाच्या गुलामासारखा वागतो याचें कारण माणसाचें धैर्य नसून त्या श्वापदाने उगीचच्या उगीच पत्करलेला भ्याडपणा व दुबळेपणा असतो. सिंहानें मनांत आणले तर चाबकाचे काडकाड आवाज करीत त्याला हुकूम सोडणाऱ्या माणसाची चटणी उडविणें त्याला कठिण का पडेल ? पण ती गोष्ट त्याच्या मनांतच येत नाहीं. तो उगीचच स्वतःची समजूत करून घेतो कीं माणसाचें सामर्थ्य फार मोठें आहे, व त्याच्या तावडींतून सुटणें आपल्याला अशक्य आहे.

माणसांना लहान मोठ्या दुष्ट संवयी लागतात, व लोकांनी त्यांस कितीही सांगितले तरी ते त्या सोडीत नाहींत याचेही कारण हेंच आहे. माणूस उगीचच स्वतःची समजूत करून घेतो, कीं अमुक एक दुष्ट संवय आपल्याला जडली, ती आतां जन्माची जडली. तिच्या मगर-मिठींतून आपली सुटका करून घेणें आतां अशक्य आहे. सकारणच नव्हे तर विनाकारणही पदोपदीं खोटें बोलणें, चुगली चहाडी करणें, अचकट विचकट बोलणें अशा दुष्ट सवयी किती तरी माणसांना जडलेल्या दिसून येतात. या गोष्टी दिसायला क्षुल्लक दिसल्या तरी तत्त्वतः मोठाल्या व्यसनांइतक्याच घातक होत. असल्या संवयी माणसानें ताबडतोब सोडल्या पाहिजेत, आणि त्या सोडण्याचा उत्तम मार्ग म्हणजे स्वतःच्या सामर्थ्यापुढे कोणत्याही दुष्ट संवयीची वास्तविक मातबरी यत्-किंचितही नसून केवळ आपल्या दुबळेपणानें तिचा गाडा ओढीत आपण चाबूक खात आहोंत अशी स्वतःच्या मनाची जागृति केली पाहिजे हा होय.




घोडा एकदां भडकला कीं कोठें नेऊन टाकील याचा काय नेम !

# मनोविकार

रामदासांनीं 'मनाचे श्लोक' लिहिले त्यांत परोपरीने स्वतःच्या मनाला एकच उपदेश केला. तो हा कीं "मनोविकाररूपी जे षड्रिपु आहेत त्यांपासून सावध रहा."

रामदासांच्या वेळेपासून आतांपर्यंत मानसशास्त्रांत पुष्कळ फरक पडला आहे. राग, लोभ, मद, मत्सर इत्यादि मनोविकारांस माणसानें आपले जन्माचे वैरी समजावें या समजुतीस आजच्या मानसशास्त्राचा आधार मिळण्यासारखा नाहीं. माणसानें सदा विवेकाने वागावे हा उपदेशही आतां पूर्वी वाटला तितका शहाणपणाचा, अगर माणसाच्या कल्याणाचा ठरणार नाहीं. कारण, मनोविकार हींच माणसांच्या लहान मोठ्या कृतींस चालना देणाऱ्या शक्तीचीं खरीं उगमस्थानें होत हे आतां सिद्ध झालेलें आहे.


असें असले तरी एवढें मात्र खचित म्हणतां येईल, कीं मनोविकार हे एखाद्या नाठाळ घोड्यासारखे आहेत. ते वेगवान् तर खरेच; पण त्यांच्यावर आपण सावधपणानें मांड ठोकून सदा बसलों तरच आपलें कल्याण होईल. नाहीं तर घोड्याने फेंकून दिलेल्या स्वारासारखी आपली फजीति व्हावयाची.




अमल्या शिलेदारांचें असेंच व्हावयाचें.

# अव्यापारेषु व्यापार

आपल्या दिमतीला चांगला जातिवंत घोडा मिळाला कीं त्याच्यावर स्वारी घालून वठणीवर आणून त्याला आपल्या ताब्यांत ठेवल्याशिवाय माणसानें राहूं नये. पण याचा अर्थ दृष्टीस पडेल त्या नाठाळ तट्टावर जीन घालून बसण्याचा माणसानें प्रयत्न करावा असा थोडाच होतो ? उलट खरा शहाणपणा म्हणजे रस्त्यानें मोकाट सुटलेल्या बिनवारशी तट्टाकडे माणसाने ढुंकूनसुद्धां पाहूं नये. हीं तट्टें दिसायला कितीही मोहक दिसलीं तरी स्वभावाने मोठीं खट्याळ असतात. संसारांत असलीं बरींच तट्टें माणसाच्या दृष्टीस पडतात. " अव्यापारेषु व्यापार " हें त्या सगळ्यांतले प्रमुख होय. ज्या गोष्टींचा व आपला अर्थाअर्थी संबंध नाहीं त्या गोष्टींच्या नादीं तुम्हीं लागलांत तर लवकरच खट्याळ घोड्याने फेकून दिल्यामुळे निवडुंगांत पडलेल्या उपद्व्यापी घोडेस्वारासारखी तुमची स्थिति होईल.




हुशार ! दांडा नीट जोडा.

# जसे विचार तसा संसार

आपण पुष्कळदां एखाद्या माणसाबद्दल बोलतों कीं, " मनुष्य चांगला हो; पण वाया गेला ! "

असें म्हणण्यांत आपला उघडच अभिप्राय असा असतो, कीं त्या माणसाच्या अंगांत गुण नाहींत असें नव्हे; पण त्या गुणांचा योग्य मार्गाने उपयोग न झाल्यामुळें ते मातीमोल झाले आहेत.

तुरुंगांत शिक्षा भोगीत पडलेल्या चोराच्या अंगीं धैर्य कमी का असते ? छे छे, अफाट धाडस हें तर त्याच्या धंद्यांतले मुख्य भांडवल ! पण, लढाईंत मरणाऱ्या सैनिकाच्या शूरत्वाचा गौरव होतो, आणि चोराला शूरत्वाबद्दल तुरुंगवास घडतो. असें कां बरें ? याचें उत्तर एवढेंच, कीं सरळ रस्ता आणि वांकडा रस्ता यांत फार अंतर आहे. दोन्ही रस्त्यांनीं जाणाऱ्या आगगाड्यांत वाफेची शक्ति एकच. पण सरळ रस्त्यानें गाडी गेली तर कल्याण होते, आणि वाकड्या रस्त्यानें गेली तर सर्वनाश होतो.

म्हणून मनुष्यानें अंगीं विविध गुण आणण्यासाठीं जितके झटलें पाहिजे तितकेंच या गुणांच्या शक्तीवर चालणारी आपल्या आयुष्याची गाडी वांकड्या मार्गानें न जातां योग्य मार्गाने जाईल अशी खबरदारी ठेवली पाहिजे.

आपल्या आयुष्याच्या गाडीला कोणता रस्ता दाखवायचा ते खरें पाहतां माणसाच्या स्वतःच्याच हातीं असतें. कारण, त्या गाडीला या नव्हे त्या रुळावर नेणारा सांधा माणसाच्या स्वतःच्या विचारामुळेंच जोडला अगर तोडला जातो. अशी एक म्हण आहे कीं, " माणूस ज्या प्रकारचे विचार मनांत ठेवील त्या प्रकारची बरी वाईट अवस्था त्याला प्राप्त होईल ! "

---




याचा दोष कोणाकडे ?

# अकारण भीति

" संकट " आणि " अडचण " हे दोन शब्द आपण दिवसांतून किती वेळां उच्चारतों याची कुणी नोंद ठेवील तर ती मोठी मनोरंजक होईल. कोणतीही नवी लहान अगर मोठी गोष्ट करण्याची वेळ आली, कीं " पण त्यांत अमुक संकट आहे. अमुक अडचणी आहेत. " अशी भाषा मनुष्य बोलूं लागतो.

पण नीट विचार केला तर असे दिसून येईल, कीं संकट एकपट असते तर मनुष्यानें आपल्या कल्पनेनें त्याचा दसपट मोठा बागुलबुवा केलेला असतो. वास्तविक पहातां संकट असते बोटभर विंचवाएवढें; पण मनुष्य आपल्या भेकडपणाच्या कांचेंतून त्याच्याकडे पाहूं लागतो, आणि त्यामुळें त्याला वाटूं लागतें, कीं तो एक भयंकर अजस्र प्राणी असून आपल्याला तो क्षणार्धात नष्ट करील. तेव्हां शहाण्या माणसानें प्रथम हातांतली भेकडपणाची कांच फेंकून दिली पाहिजे. असें केल्यास त्याला बहुतेक संकटें क्षुद्रच दिसूं लागतील, आणि नव्या नव्या पराक्रमाच्या गोष्टी करण्यास तो उद्युक्त होईल.




ही दुर्बीण जवळ ठेवा.

# आत्मविश्वास

भेकडपणाची कांच वापरल्यानें मनुष्य संकटांना भितो तर उलट पुष्कळदां माणसाच्या भीतीचें आणि निराशेचे कारण असें असतें, कीं एक मोलाची दुर्बीण त्यानें मूर्खपणानें दूर टाकलेली असते किंवा निदान तिचा त्याला विसर तरी पडलेला असतो.

या दुर्बिणीचे नांव आत्मविश्वास.

माणसाला सहसा उद्योग करायला नको असतो हे एक, आणि उद्योग सुरू केलाच तर लगेच त्याचे फळ पदरांत पडावे अशी त्याला घाई होते हें दुसरें. या दोन कारणांनींच माणसाचे बहुतेक दुःख उद्भवलेले असतें. आळस जसा वाईट त्याप्रमाणेंच प्रयत्नाच्या यशाविषयीं वाजवीपेक्षां अधिक उतावीळ असणेही वाईटच. किंबहुना असली उतावळी तर अधिक वाईट. कारण, तिच्या योगानें जे साध्य व्हायचे तें तर साधत नाहींच, आणि शिवाय जो थोडाबहुत उद्योग हातून झाला असेल तोही वांया जातो.

पुष्कळदां असें होते, कीं वास्तविक आपल्या कार्याची सिध्दि अगदीं नजीक आलेली असते, पण केवळ आपल्याला ती दिसत नाहीं म्हणून आपण कंटाळून कार्यच सोडून देतों.

जी माणसे थोर असतात तीं आपापल्या अंगीकृत कार्यासाठीं उगीच कां धडपड करीत आहेत असें भोवतालच्या सामान्य माणसांस वाटतें. पण, इतरांना कांहींही वाटलें व व्यर्थ धडपड न करण्याबद्दल त्यांनीं कितीही पोक्त (?) सल्ला दिला तरी तीं माणसें आपला प्रयत्न सोडीत नाहींत. याचें कारण एकच, कीं आत्मविश्वासाची दुर्बीण त्या थोर माणसांनीं आपल्या डोळ्याला लावलेली असते, व इतरांना न दिसणारा यशोगिरि त्यांना स्पष्ट दिसत असतो.

---




खरा बलवान कोण ?

# बळ आणि बुद्धि

मनुष्यानें आपल्या शरीरसंपत्तीकडे योग्य तेवढें लक्ष पुरविणें अत्यंत अगत्याचें आहे. विशेषतः हिंदू समाजांतील स्त्रीपुरुषांना तर बलसंवर्धनाचा उपदेश आज घटकेला जितका केला जाईल तितका हवाच आहे.

पण या उपदेशाबरोबरच तुम्ही हेंही लक्षांत ठेवले पाहिजे, कीं बुद्धिबल आणि शरीरबल या दोहोमध्ये कांहींही झालें तरी पहिलेंच अधिक प्रभावी. कारण असें कीं शरीरबल अंगीं असलें तरी ते बुद्धिचातुर्यानें वापरलें तरच हितकारक ठरतें; एरव्हीं नाहीं. 'बळी तो कान पिळी' असें आपण पुष्कळदां म्हणतों. पण, जे प्रकार पाहून आपण असे उद्गार काढतों त्या प्रकारांतसुद्धां बलिष्ठ माणसानें वस्तुतः बुद्धीची मदत घेतलेलीच असते.

कुस्ती करणारे दोघे पैलवान शरीरसामर्थ्याच्या दृष्टीनें तुल्यबल असले तर जो हुषारीने डाव करणारा असेल तोच अखेर कुस्ती मारतो. इतकेंच नव्हे तर पुष्कळ वेळां कमी तयारीचा पैलवान केवळ बुद्धि-कौशल्याच्या जोरावर भारी पैलवानाला मारून जातो.

इंग्रजींत ज्याला Brute Force (पाशवी सामर्थ्य) म्हणतात तेंसुद्धां बुद्धिमंताच्या हातीं साधन म्हणून सांपडलें तरच अचाट कामें करून दाखविते. जगाच्या प्रगतीबरोबर तर बुद्धिसामर्थ्याचे महत्व सारखें वाढत आहे. पूर्वी राष्ट्रे शरीरबलाच्या जोरावर एकमेकांना जिंकत असत. पण आतां ते दिवस गेले. १९१४ सालचे महायुद्ध शोधकांच्या कल्पना-बळानेंच बऱ्याच अंशीं लढलें गेलें; आणि आतां कधीं महायुद्ध झाले कीं त्याचा निकाल तर रणांगणापेक्षां प्रयोगशाळांतील शास्त्रज्ञांच्या बुद्धि-बळानेंच लागणार आहे.

---





वाघोबाचें सावज.

# ' देव ' आणि ' दैव ' दोन्हीं खोटीं

' देव ' आणि ' दैव ' या दोन शब्दांत एका मात्रेचाच फरक आहे. त्या शब्दांनीं व्यक्त होणाऱ्या कल्पना सारख्याच घातुक आहेत. किंबहुना एखाद्या नाण्याच्या दोन बाजूला दोन आकृती खोदलेल्या असल्या तरी तें नाणेंच जर मुळांत खोटें असेल तर ती दोन्हीं खोद–चित्रे जशीं सारखींच टाकाऊ ठरतात, तसेच ' देव ' आणि ' दैव ' यांचें आहे. या दोन्ही शब्दांच्या बुडाशीं असलेली कल्पना बदसुराच्या खोट्या नाण्यासारखी आहे. ती कल्पना म्हणजे माणसाने परावलंबी रहावे ही होय. ' देवा 'वर अगर ' दैवा 'वर विसंबून राहणारा मनुष्य परावलंबी बनतो. अर्थात् त्याच्या हातून कोणताही मोठा पराक्रम होणे अशक्य होऊन बसते.

दैववादी माणसाला वाटते कुठून तरी अकल्पितपणें दैव आपल्या साहाय्यास धांवून येणार आहे, व तसे ते आल्याखेरीज आपला भाग्योदय होणार नाहीं. अशा दैववादी माणसाच्या पाठीशीं दुर्दैवाचीं हिंस्र श्वापदें आलीं तरी त्याला ते कळत नाहीं. तो वेड्यासारखा ' दैवा 'ची वाट बघत शून्य दृष्टीने बसलेला असतो. अशा माणसावर दुर्दैवाने सहज झडप घातली तर त्यांत आश्चर्य ते काय ?

---




या विमानाला कसली आडकाठी ?

# इच्छाशक्ति

'उत्कट इच्छा असली, कीं मार्ग सांपडतो' हे सुभाषित जितकें साधें तितकेंच अमोलिक आहे. आपले बरेच उद्योग फसतात याचे कारण जें साधावयाचे त्याबद्दल आपल्याला खरी तळमळ लागलेली नसते हेच होय. लहान कीटकापासून तो मनुष्यप्राण्यापर्यंत एकंदर जीवसृष्टीची हालचाल सूक्ष्म नजरेने पाहिली तर इच्छाशक्तीपुढें सारीं संकटे विरघळतात हाच न्याय सगळीकडे लागूं असल्याचे दिसतें. नखाएवढा किडा मोठमोठ्या कठिण वृक्षांचीं कवचे नुसत्या फुंकराने फोडतो; कारण रहावयासाठीं निवाऱ्याची जागा तयार करण्याची त्याच्या ठिकाणची प्रेरणा दुर्दम्य असते. मुंगी एवढिशीच खरी, पण तिच्या ठिकाणीं जी विलक्षण इच्छाशक्ति असते तिच्या जोरावर ती वारुळाचा डोंगर उभा करते.

मनुष्यासही हाच न्याय लागूं असल्याबद्दल इतिहास स्पष्ट साक्ष देतो. आज ज्या नाना प्रकारच्या शोधांमुळे मानवी शक्तीची विस्मयकारक प्रगति झाली आहे त्या प्रत्येक शोधाच्या मागे कोणा तरी शोधकाची असामान्य इच्छाशक्तिच होती. जबरदस्त इच्छाशक्तीने प्रेरित झालेला मनुष्य विमानांत बसलेल्या माणसासारखा असतो. त्याने अंतराळांत खूप उड्डाण केलेले असते, व साऱ्या जगाला ज्या संकटावलि दुर्गम वाटल्या त्या तो लीलेने ओलांडून जातो.



प्रवेश पाहिजे ना ? मग धक्के देऊन दार उघडा.

# कर्मयोग

आतां अखेरची एकच गोष्ट सांगतो, आणि आम्ही तुमचा निरोप घेतो.

या जगांत स्तुति आणि निंदा नांवाच्या दोन स्त्रिया ठिकठिकाणीं उभ्या असलेल्या तुम्हांला दिसतील. स्तुति दिसण्यांत मोठी सुंदर स्त्री आहे. ती नेहमीं तुमच्या पुढें पुढे करील, तुमच्याकडे पाहून हंसेल आणि तुमच्यावर प्रशंसेच्या गोड गोड शब्दांची पुष्पवृष्टि करील. उलट, निंदा ही एक भयंकर स्त्री आहे. ती दिसण्यांत भेसूर आहे. ती सहसा तुमच्या पुढे येणार नाहीं, पाठीमागून हल्ला चढवील, आणि तिच्या हातीं दुष्ट मर्मभेदक भाषेचें जे डांबर आहे त्याची फेंक ती केव्हां आणि कशी करील त्याचा नेम नाहीं.

जो शहाणा मनुष्य असतो तो या दोन्ही स्त्रियांकडे पूर्ण दुर्लक्ष करतो. तो निंदा राक्षसीच्या भयंकर हल्लयानें डगमगूनही जात नाहीं किंवा सुंदर स्तुतिकामिनीच्या मोहजालांत अडकून जागच्या जागीं थांबतही नाहीं. तो आपल्या अंगीकृत उद्योगाच्या मार्गानें सरळ पुढें जात राहतो. निंदेने अगर स्तुतीनें विचलित न होतां आपलें कार्य करीत राहणें हा कर्मयोग सोपा नाहीं; परंतु ऋद्धिसिद्धि पाहिजे असतील त्याने हा कर्मयोग साध्य केलाच पाहिजे.

--- ---